केसरी

# बोनसेल थेरपीने केले यशस्वी उपचार

पुणे : भारताच्या पहिल्या नैसर्गिक अस्थिपेशी (बोन सेल) थेरपीसह पुण्यातील निवासी रुग्णांवर रिग्रो बायोसायन्सेस या भारतीय जैवतंत्रज्ञान कंपनीने विकसित केलेल्या डीजीसीआय मान्यताप्राप्त ऑसग्रोचा वापर करून पुण्यातील जहांगीर हॉस्पिटल येथे एव्हीएन (अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस ) या आजाराने त्रस्त असलेल्या रुग्णांवर यशस्वी उपचारपद्धती करण्यात आली आहे . एव्हीएन ( अव्हॅस्क्युलर नेक्रोसिस) या आजारवर करण्यात येणारी ऑसग्रो ही पेशीवर आधारित उपचार पद्धती आहे. ही उपचार पद्धत सर्वात प्रथम पुण्यातील ५७ वर्षीय पुरुष व ३६ वर्षीय महिलेवर करण्यात आली आहे.